MHST110000262019

**नियमीत दिवाणी दावा क्र. ११/२०१९**

**नथु उर्फ नाथाजी शेटे : वादी**

**वि.**

**शकुंतला पडवळ वै. : प्रतिवादी**

**आदेश निशाणी क्र. ७५ करीता**

प्रस्तुतचा अर्ज, वादी यांनी मयत प्रतिवादी क्र. ०८–महादेव सावळा शेटे याच्याविरुध्द झालेला दावा उपशमन (abatement) रद्दबातल होवुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. वादी यांचे कथन की, प्रतिवादी क्र. ०८–महादेव सावळा शेटे हे दि. ११.०१.२०२४ रोजी कण्हेर, ता. जि. सातारा येथे मयत झाले आहेत. परंतु, वादी हे सातारा येथे राहणेस असल्याने त्यांना प्रतिवादी क्र. ८ मयत झाल्याची बाब उशीरा समजली. त्यामुळे, वादी यांना मयत प्रतिवादी क्र. ०८ चे वारस अभिलेखावर मुदतीत घेता आले नाही. त्यामुळे, प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र. ०८–महादेव यांच्या विरुध्द दावा उपशमन (abate) झाला आहे. अशा परिस्थीतीत मयत प्रतिवादी क्र. ०८–महादेव यांचेविरुध्द दावा उपशमन (abatement) रद्दबातल झाला नाही तर वादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, वादीने दावा प्रतिवादी क्र. ०८–महादेव विरुध्द दावा उपशमन (abate) रद्द होण्याची विंनती केली. करीता प्रस्तुतचा अर्ज.

०३. प्रतिवादी क्र. १, ७,८,९,११ व १२ यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे देवुन अर्ज मंजुर करणेस तीव्र आक्षेप नोंदवला आहे. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, वादी यांनी ०७ महिने उशीराने प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. वादी यांनी उशीराबाबतचे संयुक्तिक कारण अर्जात दिलेले नाही. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज फेटाळण्यात यावा व अर्ज मंजुर केल्यास वादी यांच्यावर जास्तीत जास्त वादखर्च (cost) लादणेत यावा.

०४. वादी व प्रतिवादी यांचे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

०५. अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. ०८–महादेव हे दि ११.०१.२०१४ रोजी मयत झाले आहेत. परंतु, वादी यांना प्रतिवादी क्र. ०८ हे मयत झाल्याची बाब त्यांना उशीरा समजले असे त्यांनी त्यांच्या अर्जात कथन केले आहे. सबब, दावा प्रतिवादी क्र. ०८–महादेव यांच्याविरुध्द दावा उपशमन (abate) झाला आहे. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीचे सरसन निरस मानाने वाटप व निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यामुळे, दावा मिळकतीबाबत वादी व मयत प्रतिवादी क्र. ०८–महादेव यांचे हितसंबध गुंतलेले असल्याने, त्याचा न्यायनिवाडा होण्यासाठी प्रतिवादी क्र. ०८–महादेव यांचेविरुध्द झालेला दावा उपशमन (abate) रद्द होणे न्यायोचीत ठरते. तसेच, वादी यांचा प्रतिवादी क्र. ०८– महादेव याचे वारस अभिलेखावर घेणेस जो विलंब झाला आहे, तो विंलब माफीचा अर्ज (नि.क्र.७३) हा मंजुर करणेत आलेला आहे. तसेच वादी यांनी प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ निशाणी क्र. ७६ कडे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. सबब, प्रस्तुत दावा गुणदोषावर निकाली करण्यासाठी प्रतिवादी क्र. ०८– महादेव याचेविरुध्द झालेला उपशमन (abatement) रद्द करुन प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादी यांचा अर्ज नि.क्र. ७५ मंजूर करण्यात येत आहे.

२. मयत प्रतिवादी क्र. ०८– महादेव सावळा शेटे याच्या विरुध्द झालेले उपशमन (abatement) रद्दबातल करणेत येत आहे.

VIKRAM AMBADAS AVHAD
Digitally signed by VIKRAM AMBADAS AVHAD
Date: 2026.07.07 17:43:53 +0530

**दिनांक** – ०७.०७.२०२६ (डॉ. विक्रम अं. आव्हाड)

**ठिकाण – मेढा** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मेढा**